**कोल्हापूर जिल्हा परिषद कोल्हापूर**
**स्थायी समिती सभा क्रं. ३६ सन २०२४-२०२५**
**शुक्रवार दिनांक ०८-११-२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता**
**स्थळ :- स्व. वसंतराव नाईक सभागृह, जिल्हा परिषद कोल्हापूर**

==========================================================================

**कार्यवृत्तात**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ०८-११-२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता मा.स्व. वसंतराव नाईक समिती सभागृह, जिल्हा परिषद कोल्हापूर येथे प्रत्यक्षात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचा कार्यवृत्तांत खालीलप्रमाणे आहे.

येणेप्रमाणे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक, तसेच संबधीत खाते प्रमुख, अधिकारी सभेस उपस्थित झाले व सभा कामकाजास सुरूवात झाली.

**सचिव** :- सर्वांना नमस्कार, कोल्हापूर जिल्हा परिषदेची प्रशासक कालावधीतील स्थायी समिती सभा आज शुक्रवार दिनांक ०८-११-२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता इ. रोजी आयोजित केली आहे. आजच्या सभेसाठी उपस्थित असलेले जिल्हा परिषदेचे मा. श्री. कार्तिकेयन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासकसो, मा. संतोष जोशी अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.श्रीम. सुषमा देसाई प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यो. कोल्हापूर तसेच संबधीत खाते प्रमुख अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करते. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक यांच्या मान्यतेने सभा कामकाजास सुरूवात करते.

**विषय क्रं. १** :- स्थायी समिती सभा दिनांक ११-१०-२०२४ इ. रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न झाली त्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे. (**सा.प्र.**)

**सचिव** :- सर्व खातेप्रमुखांना मागील आठवडयातच सदर सभेचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला आहे. याबाबत याबाबत कोणत्या विभागाची काही अडचण आहे का ?

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक** :- कोणत्याही विभागाची सदर कार्यवृत्तांताबाबत काही आक्षेप नाही असे समजून कार्यवृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ठराव क्रंमाक :- ५०३** **दिनांक ०८-११-२०२४**

स्थायी समिती सभा दिनांक ११-१०-२०२४ इ. रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न झाली होती. सदर स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांचे सभागृहात वाचन करणेत येवून सर्वानुमते इतिवृत्त कायम करणेतबाबतचा ठराव पारित करणेत आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्रं. २** :- स्थायी समिती सभा दिनांक ११-१०-२०२४ इ. रोजी दुपारी १.०० संपन्न झाली त्या स्थायी समिती सभेतील मंजूर ठरावावरील कार्यालयीन तजबीज जाहीर करणे. (**सा.प्र.**)

**सचिव** :- स्थायी समिती सभा दिनांक ११-१०-२०२४ इ. रोजी दुपारी १.०० संपन्न झाली त्या स्थायी समिती सभेतील मंजूर ठरावावरील कार्यालयीन तजबीज जाहीर करणेबाबत.

**विषय क्रं. ३** :- सप्ताहामध्ये प्राप्त झालेल्या महत्वाचे शासन निर्णय / परिपत्रके वाचन करणे.

**सचिव** :- विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता असलेने आजच्या सभेमध्ये मान्यतेचे विषय नाहीत.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक** :- आणखीन कोणत्या विभागाकडील विषय असलेस घ्यावेत विषय नसलेस सभा थांबवूया.

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) तथा सचिव** :- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासकसो यांचे परवानगीने सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपन्न झाली.

(मनीषा देसाई)
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**

(कार्तिकेयन एस.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**